# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ८५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. मुरलीधर जोतीराम वायचळ,<br>७ ए, महादेवनगर, लक्षतीर्थ वसाहत, कोल्हापूर<br>द्वारा : २९/४९२, लक्षतीर्थ वसाहत, कोल्हापूर | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग, ताराबाई पार्क, कोल्हापूर | विरूध्द पक्षकार |

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
पश्चिम (शहर) उप विभागीय कार्यालय, कोल्हापूर

<u>कोरम</u> :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. मुरलीधर जोतीराम वायचळ, ७ ए, महादेवनगर, लक्षतीर्थ वसाहत, कोल्हापूर यांनी मंचाकडे अनुसूचि ' अ ' मध्ये दि. ८.४.२०१० रोजी तक्रार दाखल केली. तक्रारदाराकडे वितरण कंपनीचे घरगुती वीज कनेक्शन असून त्याचा ग्राहक क्र. २६६८२०८५२३८९ असा आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार श्री. पंडीत जोतीराम वायचळ यांना राहणेसाठी स्वत:चे मालकीच्या इमारत क्र. एजी/२९/४९२ मधील वरच्या मजल्यावरील दोन खोल्या तात्पुरत्या काळासाठी दिलेल्या असून सदर जागेचा ताबा घेण्यासाठी श्री. पंडीत यांचेविरुध्द दिवाणी न्यायालय, कोल्हापूर येथे दावा दाखल केलेला आहे.

श्री. पंडीत वायचळ हे आश्रित आहेत असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. त्यांना यापूर्वीच प्रस्तुतचे ग्राहक क्र. २६६८२०८५२३८९ वर तक्रारदार यांचे संमत्तीने विद्युत पुरवठा मंजूर केलेला आहे. तक्रारदार यांनी परिशिष्ट अ मध्ये अ.क्र. ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. ५.११.२००७ रोजी वि.प.कडे गाऱ्हाणे कळविले आहे. कार्यकारी अभियंता, शहर विभाग, कोल्हापूर यांनी दि. २.४.२००८ च्या पत्राने सदरचे कनेक्शन पूर्णपणे अधिकृत असल्याचे कळविले आहे. तक्रारदार यांना मंचाकडून अपेक्षित मदत वि.प.ने श्री. पंडीत वायचळ यांना दिलेले अनधिकृत वीज कनेक्शन रद्द करण्यात यावे कारण नियम, संहिता व कायद्याविरुध्द आहे. त्याच्या पृष्ट्यर्थ अनूसूचि अ सोबत जोडलेली कागदपत्रें श्री. पंडीत जो. वायचळ यांचा फॉर्म डी मधील अर्ज व त्यासोबतचे प्रतिज्ञापत्राची प्रत, तक्रारदाराचा दि. ५.११.२००७ च्या अर्जाची प्रत, विधी सहाय्यक यांचे दि. ३.१२.२००७ चे पत्राची प्रत व घेतलेली हरकत आणि महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मूलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ मधील परि.३ एक्स,वाय, झेडचा गोषवारा.

वितरण कंपनीने आपल्या दि. २२.४.२०१० च्या लेखी अहवालात श्री. पंडीत जो. वायचळ यांचे कनेक्शनबाबत वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विधी सल्लागार यांचा सल्ला घेतला होता. विधी सल्लागार यांनी श्री.पंडीत वायचळ हे भोगवटदार आहेत असा सल्ला दिला असल्याने त्यांना विद्युत कनेक्शन देण्यात आले आहे व ते बरोबर आहे.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी दि. १७.५.२०१० रोजी मंचासमोर घेण्यात आली. तक्रारदार स्वत: हजर. वि.प.तर्फे श्री. एस.आर. घाटे, कनिष्ठ अभियंता हजर. तक्रारदार यांनी सांगितले की, प्रस्तुतचे घर हे झोपडपट्टीमध्ये आहे चार खोल्याचें दोन मजली आहे व त्यामध्ये सन १९७७ मध्ये वीज कनेक्शन देण्यात आले आहे. श्री. पंडीत जो. वायचळ हे त्यांचे भाऊ आहेत. त्यांना राहण्यासाठी, वापरासाठी म्हणून २ खोल्या दिल्या व तेथे विद्युत पुरवठा दिला. वीज बिलाचा वाद झाल्यावर ताब्याचा दावा दाखल केला. तसेच श्री. पंडीत वायचळ यांच्या ताब्यात दोन खोल्या असतांना त्यांना वीज कनेक्शन हे ५ खोल्यांसाठी दिले आहे. तक्रारदार यांनी दि. ५.११.२००७ रोजी वितरण कंपनीकडे आक्षेप घेतला होता, त्याचा कांही उपयोग झाला नाही. तक्रारदार यांचे म्हणणे की, विधी सहाय्यक यांनी दिलेला सल्ला हा चुकीचा आहे, कायदेशीर नाही. त्या पृष्ट्यर्थ त्यांनी Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance [ 1971 : Mah. XXVIII and Redevelopment ] Act 1971 - Chapter 1-B " Protected Occupiers their Relocation and Rehabilitation 3 X मधील व्याख्याचा आधार घेवून श्री. पंडीत वायचळ हे " Protected Occupiers " होऊ शकत नाहीत, कारण त्यांचेकडे फोटोपास नाही. तेव्हा वितरण कंपनीने त्यांच्या हरकतीकडे दूर्लक्ष करुन श्री. पंडीत वायचळ यांना वीज कनेक्शन दिले आहे ते बंद करण्यात यावे असे वि.प.ला आदेश द्यावेत अशी मंचाकडे विनंती केली आहे. या उलट, वि.प.तर्फे श्री. घाटे, इन चार्ज उप कार्यकारी अभियंता यांनी असे प्रतिपादन केले की, महाराष्ट्र शासन हे झोपडपट्टीचे मालक आहेत. विधी सल्लागार यांचा सल्ला घेवून व श्री. पंडीत वायचळ यांचे ॲफेडेव्हीट घेवूनच वीज कनेक्शन देण्यात आले आहे. श्री. पंडीत वायचळ हे कायदेशीर भोगवटादार आहेत असे ग्राह्य धरुन त्यांना कनेक्शन दिले आहे, त्यामुळे तक्रार फेटाळण्यात यावी.

वरील विवेचनावरुन खालील दोन मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांनी विनंती केल्याप्रमाणे श्री. पंडीत वायचळ यांना वितरण कंपनीने दिलेले वीज कनेक्शन रद्द करण्याचे आदेश देण्याची विनंती मान्य करता येईल काय ?

उत्तर : नाही

२) तक्रारदाराची तक्रार मुदतीत आहे काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर याचेकडे क्ष फॉर्ममध्ये तक्रार केल्याचे कागदपत्रावरुन दिसते. परंतु तक्रार मंचासमोर अ नमुन्यामध्ये अर्ज दाखल करतांना या बाबीचा उल्लेख केलेला नाही. अंतर्गत कक्षाचा आदेश दि. १०.२.२०१० रोजी पारित झाल्याचे दिसते. असे असले तरी, तक्रारदाराने उपस्थित केले मुद्दे विचारांत घेता, त्यांचे बंधू श्री. पंडीत वायचळ यांना दिलेले वादातील वीज कनेक्शन अनधिकृत आहे काय ? याची तपासणी करणे जरुरी आहे. त्यापूर्वी मंचाकडे केलेली तक्रार मुदतीत आहे काय ? या प्रश्नाचा ऊहापोह करणे योग्य होईल.

मंचासमोर दि. ८.४.२०१० रोजी तक्रार करण्यात आली आहे. त्यापूर्वी अनुसूचि अ मधील अनुक्रमांक ५ नुसार तक्रारदार यांनी वि.प.स दि. ५.११.२००७ रोजी हरकत घेतल्याचे दिसते. त्या हरकतीची एक प्रत तक्रारी सोबत जोडलेली आहे. श्री. पंडीत जो. वायचळ यांचे नांवे फुलेवाडी शाखेतून नवीन विद्युत पुरवठा करण्यात आला आहे ही वस्तुस्थिती दि. ३.११.२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता तक्रारदार यांचे निदर्शनास आली आहे. या बाबत त्यांनी लगेचच हरकत घेतल्याचे दिसते. त्यानंतर दि. २.४.२००८ रोजी कार्यकारी अभियंता, शहर विभाग, कोल्हापूर यांनी तक्रारदार यांस श्री. पंडीत जो. वायचळ यांना दिलेले वीज कनेक्शन पूर्णपणे अधिकृत असल्याचे कळविले आहे. याचाच अर्थ तक्रारदार यांस श्री. पंडीत जो. वायचळ यांचे वीज कनेक्शन बाबतची माहिती किंवा हरकत घेण्यासाठी दि. ५.११.२००७ रोजी कारण उत्पन्न झाले आहे व त्यानंतर त्यांना दि. २.४.२००८ रोजी संबंधित कार्यकारी अभियंता (शहर) कोल्हापूर यांनी सदर कनेक्शन अधिकृत असल्याचे कळविले आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम २ चे नियम ६.६ नुसार २ वर्षानंतरचे कालावधीची तक्रार मंचाकडे दाखल करता येणार नाही असा आहे.

Forum shall not admit any grievance unless it is filed within 2 years from the date from which cause of action has arisen.

विधी सहाय्यक यांनी पत्राने दि. ३.१२.२००७ रोजी उप कार्यकारी अभियंता, वेस्ट झोन, कोल्हापूर यांना तक्रारदार यांस नोटीस द्यावी असे मत दिले आहे. त्या पत्रामध्ये Why the electricity connection will not be supplied to the said property having possession of Pandit J. Waichal असे मत दिले आहे. या सल्ल्याची कल्पना तक्रारदार यांना देण्यात आलेली होती, त्यामुळे तक्रारदार यांस वि.प.ने दिलेले कनेक्शनबद्दल जे गाऱ्हाणे मांडले आहे त्यासाठी तेव्हाच कारण उपलब्ध झाले होते. त्यामुळे प्रस्तुतची तक्रार दि. ८.४.२००८ म्हणजेच २ वर्षानंतर करण्यात आली आहे हे स्पष्ट होते. ती दि. २.४.२००८ चे कार्यकारी अभियंता (शहर) कोल्हापूर यांचे पत्रापासून जरी ग्राह्य धरली तरी मुदतबाह्य आहे, त्यामुळे मुद्दा क्र. २ चे उत्तर तक्रार मुदतीत नाही असे देण्यात येत आहे.

आता तक्रारदार यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा विचार करता, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठ्याची संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम २००५ मधील तरतुदीनुसार श्री. पंडीत जो. वायचळ यांचे ॲफिडेव्हीट घेवून वीज कनेक्शन देता येईल काय ?

सदर ॲफिडेव्हीटमध्ये श्री. पंडीत जो. वायचळ यांनी घरगुती वापरासाठी वीज कनेक्शन मिळाल्यानंतर कांही तक्रार निमार्ण झाल्यास त्याची तोशिस म.रा.वि. वितरण कंपनीस लागू देणार नाही, तसेच सदर कनेक्शन बंद झालेस मी वितरण कंपनीविरुध्द कोणत्याही प्रकारे तक्रार करणार नाही असे नमूद केले आहे. अशा परिस्थितीत श्री. पंडीत जो. वायचळ हे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चा विचार करतां, Legal Occupier होत नाहीत. वितरण कंपनीने त्यांची योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करुन न घेता केवळ ॲफिडेव्हीटवर कनेक्शन दिल्याचे दिसते. तक्रारदार यांनी –

Protected Occupiers their relation and rehabilitation Chapter 1-B Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance [ 1971 : Mah. XXVIII and Redevelopment ] Act 1971 मंचाच्या निदर्शनास आणले त्यामध्ये

3 X (b:)

Photo-pass means an identity card-cum-certificate issued by the Government in the prescribed format under Section 3 Y and shall include such other document or documents declared by Government, by order issued in this behalf, to be equivalent of photo-pass for the purposes of this Chapter

3 X (c:)

"Protected Occupier " means an occupier of a dwelling structure who holds a photo-pass.

तक्रारदार यांनी आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ महाराष्ट्र शासनाचे भू–भागधारकाची/ झोपडी मालकाची पत्रिका हजर केली, त्यामध्ये तक्रारदार यांचे एकट्याचेच नांव आहे. तसेच तक्रारदार यांनी कोल्हापूर महापालिकेचे ॲडव्होकेट श्री. पी.एस. वाळवेकर यांना अग्रेषित केलेले पत्र दाखल केले आहे त्यामध्ये श्री. मुरलीधर जो. वायचळ यांचे नांवे १९९९ मध्ये परिचय पत्र देणेत आल्याचे म्हटले आहे. ॲडव्होकेट वाळवेकर यांचे अशिल कोण ? हे स्पष्ट होत नाही. परंतु कोल्हापूर महानगरपालिकेची कर आकारणी २००३–०४ पहातां, ती तक्रारदार श्री. मुरलीधर जो. वायचळ यांचेच नांवे आहे. त्यामुळे श्री. पंडीत जो. वायचळ हे दोन खोल्यांच्या जागेतील कनेक्शनसाठी तक्रारदार यांची संमत्ती घेणे आवश्यक होते. प्रत्यक्षात २ खोल्या ताब्यात असतांना, विधी सहाय्यक यांनी श्री. पंडीत जो. वायचळ यांना ५ खोल्यांमध्ये कनेक्शन द्यावे असा उल्लेख केला आहे. तक्रारदार यांचे दि. १.१२.२००९ चे विधी सल्लागार, कोल्हापूर यांना अग्रेषित केलेले पत्र पहातां, श्री. पंडीत जो. वायचळ यांना दिलेला विद्युत पुरवठा हा तक्रारदाराचे तक्रारीनंतर स्थगित करण्यात आला होता. विधी सहाय्यकांचे legal occupier बाबतचे मत विसंगत आहे असे तक्रारदारांनी म्हटले आहे. अशा परिस्थितीत वि.प.च्या अधिकाऱ्यांनी श्री. पंडीत जो. वायचळ यांचे नांव असेसमेंट उताऱ्यात आहे म्हणून कनेक्शन दिले हे ग्राह्य वाटत नाही, कारण ते कायदेशीर भोगवटादार होवू शकत नाही. विधी सहाय्यक यांनी तक्रारदार यांना नोटीस द्यावी त्यांनी जर कोर्टातून मनाई आणली नाही तर कनेक्शन द्यावे असे मत दिले आहे ते विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ चे विरुध्द आहे. विद्युत पुरवठा हा नियमानुसार द्यावा असे मत देणे जरुरी होते. १५ दिवसांच्या मुदतीत कोर्टातून मनाई आणलेस वीज कनेक्शन देवू नये असे मत विधी सहाय्यकांनी दिले आहे त्यानुसार तक्रारदार यांनी १५ दिवसांत मनाई आणलेली नाही. त्यामुळे वि.प.स विद्युत पुरवठा देण्यास कांही हरकत नाही.

Our Company will not have any obstruction to supply electricity connection to the said property हे चूक आहे.

असे असले तरी, वि.प.ने केवळ असेसमेंट उताऱ्यामध्ये श्री. पंडीत जो. वायचळ यांचे नांव आहे किंवा त्यांचे ॲफिडेव्हीटवर विसंबून वीज कनेक्शन देणे हे विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ चे विरुध्द आहे असे दिसते. तसेच त्या जागेसंबंधात दिवाणी न्यायालयात वाद आहे हे रेकॉर्डवर आले आहे. तक्रारदार यांच्या इमारतीचा सन १९७७ मध्ये दिलेल्या वीज कनेक्शनचा वि.प.च्या दफ्तरी नोंदविलेला क्र. ७ ए, महादेवनगर असा असून तोच आजपर्यंत चालू आहे, तरीही श्री. पंडीत वायचळ यांनी त्याच इमारतीचा क्र. एजी २९/४९२, महादेवनगर असा सादर केला आहे त्याची खातरजमा किंवा शहानिशा वि.प.ने केली नाही. या कारणांमुळे दिलेला विद्युत पुरवठा कायदेशीर नाही असे म्हणता येईल.

त्यामुळे विद्युत पुरवठा बंद करावा असे प्रतिबंधात्मक आदेश देणे मंचाच्या अधिकार कक्षेत (Discretion ) येते असे मंचाचे प्रथमदर्शनी मत झाले आहे. तक्रारदाराची तक्रार ही कालबाह्य, हरकत घेण्याचे कारण निर्माण झाल्यापासून २ वर्षांनंतर दाखल केली आहे त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम २ चे नियम ६.६ नुसार तक्रार निकाली काढणेत येत आहे. याचा अर्थ वि.प.ने श्री. पंडीत जो.वायचळ यांना दिलेले कनेक्शन कृती मानके विनियमाप्रमाणे योग्य ठरते असे मानता येत नाही. मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

वरील विवेचनावरुन मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवून तक्रार फेटाळण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

तक्रारदाराच्या तक्रारीची सुनावणी दि. १७.५.२०१० रोजी घेण्यात आली. सांगली विभागातील चलनाच्या व डी.डी.एफ. योजनेखालील प्रकरणे निर्णयासाठी मंचासमोर प्रलंबित होते. कोल्हापूर विभागातील तक्रार क्र. ५९–६०/२०१० व तक्रार क्र. ६१/२०१०, २०४/०९ व सोलापूर विभागातील श्री. आईस कं. २२४/०९ व २०१/०९ व इतर प्रकरणांचे निर्णयासाठी मंचाचा वेळ गेल्याने प्रस्तुतची तक्रार २ महिन्यांचे कालावधीत निकाली काढणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही

3) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : २७.७.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ८५–२०१०/ दिनांक :

तक्रारदार श्री. मुरलीधर जोतीराम वायचळ, ७ ए, महादेवनगर, लक्षतीर्थ वसाहत, कोल्हापूर यांनी मंचाकडे दि. २६.८.२०१० ला अर्ज देवून ६ दिवसांचा विलंब माफ करावा व मंचाने दिलेल्या न्याय निर्णयाचे पुनर्विलोकन करुन सुधारित आदेश द्यावेत अशी विनंती केली आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील तरतुदीनुसार मंचास निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याचे अधिकार नाहीत. तसेच तक्रारदार अर्जदाराचा तक्रार दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित करण्याचे अधिकारी नाहीत. त्यामुळे तक्रारदाराने दि. २६.८.२०१० च्या अर्जाद्वारे विलंब माफ करण्यास केलेल्या विनंती अर्जाचा मंच विचार करु शकत नाही असे तक्रारदार अर्जदार श्री. मुरलीधर जो. वायचळ यांना कळवावे.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराचा दि. २६.८.२०१० चा अर्ज निकाली काढणेत येत आहे.

२) मंचाला तक्रारीत मागणी केल्याप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील तरतुदीनुसार निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याचे अधिकारी नसलेने अर्ज निकाली काढणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| जी.सी. लेले | जी.बी. पानकर | बी. जी. पवार, |
| सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर |